Annexure XX(4)
(Vide Article-20.09)

XX 20.9(1)

(4)

[शे.का.मु.—६.०० ००० -११-८३-पी.
शा.नि., पी.इस्तपुरी क्र. ३९३८ दि.
शा.प. क्र. अंकुअंगअंग-१०८०/१३१० १८०० (९०) ताबंबि-२,
दि. २३-१०-८३ ]

सा. बां. वि. १०१-अ म.
P. W. D. 101-A m.

नमुना ब–२

सार्वजनिक बांधकाम विभाग/पाटबंधारे विभाग

# उक्ती कामे (बाबवार दर)

---

## निविदा आणि शर्ती

---

टीपा

(शासन निर्णय, क्रमांक ३६८-ग-१७३२, दिनांक ९ ऑक्टोबर १८८९ द्वारे मुद्रांक शुल्कमुक्त)

हा नमुना, खाली उद्धृत केलेल्या महाराष्ट्र सरकारी बांधकाम नियम-पुस्तिकेतील परिच्छेद १८८ मध्ये व्याख्या केलेल्या उक्त्या कामाकरिता वापरावयाचा आहे —

"उक्ते काम म्हणजे ज्याकरिता करावयाच्या एकूण कामाचे परिमाण किंवा ते ज्या मुदतीत पूर्ण करावयाचे आहे, ती मुळीच विचारात न घेता, उक्ते काम करणारा कामाचा फक्त दरच संमत करतो, ते काम होय"

---

ZX 20·9(i) (5)

नमुना अ–२

सार्वजनिक बांधकाम/पाटबंधारे विभाग

सन १९८                                   चा क्रमांक

उक्त्या कामाकरिता निविदा

(बाबवार दर)

मी याद्वारे, खाली वर्णन केलेले काम खाली नमूद केलेल्या शर्तींनुसार उक्त्या कामाप्रमाणे आणि अनुसूची "ब" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निविदा दराने, पूर्ण केलेल्या कामाच्या परिमाणाकरिता मोबदला देऊन पार पाडण्याकरिता, निविदा सादर करीत आहे. जेव्हा शासन अशा कामाकरिता कोणतीही साधनसामग्री पुरवते, तेव्हा अशी साधनसामग्री आणि त्याकरिता प्रदान करावयाचे दर यांबाबतच्या अनुसूची "अ" मधील तरतूद केल्याप्रमाणे असतील.

मुख्य लवादाच्या कामासंबंधीचे नियम व आदेश मी वाचले आहेत आणि ते मला समजावून सांगण्यात आले आहेत आणि मी हे मुख्य लवादाचे काम, पूर्णत: या नियमानुसार व आदेशानुसार पार पाडण्यास आणि त्याचे यथायोग्य अनुपालन करण्याकरिता मला स्वत:ला जबाबदार ठरवण्यास, सहमती देत आहे.

निविदा सादर करण्यापूर्वी कंत्राटदाराची सही.

कंत्राटदार—

पत्ता

दिनांक                    १९८

कंत्राटदाराने सही केल्याबद्दलच्या साक्षीदाराची **सही.**

साक्षीदार—

पत्ता—

व्यवसाय—

याद्वारे उपरोक्त निविदा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकरिता आणि त्यांच्या वतीने मी स्वीकारीत आहे.

स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याची सही

कार्यकारी अभियंता                                   विभाग

दिनांक                    १९८

E 20.9(1)

(4)



## शर्ती

हे काम, योग्य अशा सफाईने करावयाचे आहे आणि संपूर्ण काम कुशलतेने पार पाडावयाचे आहे. बाबरच्याच आलेली साधनसामग्री निविदा करणाऱ्या व्यक्तीने/व्यक्तींनी पुरवली असेल तेव्हा ती उपलब्ध असणाऱ्या विविध प्रकारच्या साधनसामग्रीपैकी उत्तम दर्जाची असली पाहिजे आणि ती सामग्री सर्वच बाबतीत, कामाच्या प्रतीविषयीचा आणि कामाच्या किंवा साधनसामग्रीच्या दर्जासंबंधीचा, ज्या कार्यकारी अभियंत्याचा निर्णय अंतिम असेल, अशा तत्कालीन कार्यकारी अभियंत्याच्या मान्यतेच्या अधीन असली पाहिजे.

१ (अ) जर कोणत्याही कारणासाठी, कामाकरिता आवश्यक असलेली कोणतीही साधनसामग्री, अनुसूची "ड" अनुसार पाटबंधारे/सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भांडारामधून किंवा प्रभारी अभियंत्याकडून पुरविणे, आवश्यक असल्याचे आढळून आले असेल तर अशा पुरवण्यात आलेल्या साधनसामग्रीची किंमत, साधन-सामग्री सुपूर्त करण्यापूर्वी आगाऊ रोख रकमेत वसूल केली पाहिजे. मात्र त्यावेळी उक्ते काम करणाऱ्याला प्रदेय असणारी कोणतीही रक्कम त्याला पुरवण्यात आलेल्या साधनसामग्रीची किंमत वसूल होण्याकरिता पुरेशी असली पाहिजे आणि अशा बाबतीत प्रभारी अभियंत्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार अशी किंमत त्याला प्रदेय असलेल्या रकमेतून वजा करता येईल. तथापि, उक्ते काम करणाऱ्याला पुरवण्यात आलेली सर्व साधनसामग्री संपूर्णत: शासनाची मालमत्ता राहील आणि त्यांची संपूर्ण किंमत उक्ते काम करणाऱ्याकडून वसूल होईपर्यंत कामाच्या ठिकाणाहून कोणत्याही कारणास्तव हलवता येणार नाही.

२. पार पाडलेल्या कामाचे परिमाण, महिन्यातून निदान एकदा तरी, मोजले गेले पाहिजे व त्याची रक्कम चुकती केली पाहिजे. अतिप्रदान व निकृष्ट दर्जाचे काम होऊ नये याबद्दल खबरदारीचा उपाय म्हणून अशिल्लक कामाच्या किमतीच्या कमीतकमी तीन व जास्तीत जास्त १० टक्के इतकी रक्कम, कार्यकारी अभियंत्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार रोखून ठेवता येईल. काम पूर्ण झाल्यानंतर किंवा हा करार समाप्त झाल्यानंतर अंतिम मोजमापाची नोंद करण्यात येईल आणि तदनुसार लेख्याचे समायोजन करून शर्त क्रमांक तीनमध्ये वर्णन केल्याप्रमाणे अतिप्रदानामुळे किंवा निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कोणत्याही रकमेची कपात करावयाची असल्यास, अशी कपात केल्यानंतर रोखून ठेवलेली रक्कम परत करण्यात येईल.

३. काम समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर, कार्यकारी अभियंता त्याप्रमाणे काम पूर्ण केल्याबद्दलचे प्रमाणपत्र उक्ते काम करणाऱ्याला देईल, परंतु उक्ते काम करणारा, ज्या ठिकाणी काम पार पाडण्यात आले, त्या ठिकाणाहून सर्व मचाणसामान, जास्तीची साधनसामग्री आणि कचरा जोपर्यंत हलवणार नाही, आणि जेथे किंवा ज्यावर काम पार पाडावयाचे आहे, तेथून किंवा काम पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी, जी इमारत ताब्यात घेतली असेल, तेथून सर्व प्रकारचे सुतारकाम, दरवाजे, खिडक्या, भिंती, तळजमिनी आणि इमारतीचे इतर भाग यावरील कचरा काढून तो साफ करणार नाही तोपर्यंत तसेच कार्यकारी अभियंत्याने आलेल्या कामाची मोजमापे घेतली नसतील किंवा जेव्हा अशी मोजमापे त्याच्या सहाय्यकाने घेतलेली असतील तेव्हा, अशी मोजमापे उक्ते काम करणाऱ्यावर बंधनकारक आणि निर्णायक असल्यामुळे त्यांना कार्यकारी अभियंत्याची मान्यता मिळे-पर्यंत असे पूर्तता प्रमाणपत्र दिले जाणार नाहीच. त्याशिवाय ते काम पूर्ण झाले असल्याचे मानले जाणार नाही.

४. कार्यकारी अभियंता, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, कोणत्याही वेळी हा करार समाप्त करू शकेल आणि काम किंवा साधनसामग्री सदोष असल्याचे आढळून आल्यास, त्याबाबतीत कार्यकारी अभियंता ते काम किंवा ती साधनसामग्री काढून टाकून ते काम पुन्हा करवून घेऊ शकेल किंवा ती साधनसामग्री बदलू शकेल. आणि नाकारलेल्या कामाची किंवा काढून टाकलेल्या साधनसामग्रीची किंमत किंवा त्याला योग्य वाटेल ती साधनसामग्री पुन्हा बसवण्याची किंमत ही निविदा सादर करणाऱ्या व्यक्तींना देय असलेल्या किंवा होणाऱ्या अशा कोणत्याही रकमेतून वजा करून घेऊ शकेल.

५. खाणीच्या संबंधातील सर्व फी, स्वामित्वधनाच्या रकमा, जकातकर आणि साधनसामग्री साठवून ठेवण्यासाठी जमिनीचे भाडे असल्यास ते उक्ते काम करणारा देईल, मात्र कार्यकारी अभियंत्याकडून ती साधन-सामग्री शासकीय कामामध्ये वापरण्याकरिता आवश्यक होती, अशा अर्थाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, नियमानुसार जतुसेव असेल, इतक्या खर्चाची रक्कम परत मिळण्याचा त्याला हक्क असेल.

६. उक्ते काम करणारा, त्याच्या हाताखालील कामगारांना झालेल्या इजेबद्दल कामगार भरपाई अधि-नियम १९२३ (१९२३ चा आठ) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधलेला) अनुसार प्रदेय असणारी नुकसानभरपाई देण्यास जबाबदार असेल आणि अशी कोणतीही नुकसानभरपाई त्याने दिली पाहिजे. जर अशी नुकसानभरपाई उक्ते काम करणाऱ्याच्या वतीने शासनाने, प्रवर्तक म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १२ च्या पोटकलम (१) अनुसार दिली असेल तर शासन ती रक्कम उक्त कलमाच्या पोट-कलम (२) अनुसार उक्ते काम करणाऱ्याकडून वसूल करू शकेल. अशी नुकसानभरपाईची रक्कम इतर कोणत्याही हक्काला व उपायांना बाध न आणता, निविदा करणाऱ्या व्यक्तीला/व्यक्तींना प्रदेय असणाऱ्या किंवा प्रदेय होतील, अशा कोणत्याही रकमेतून वजा करता येईल.

XX 20·9(1)





६ (अ) ज्या कामगाराला अपघातामुळे शारीरिक इजा झाली असेल अशा कोणत्याही कामगाराला वैद्यकीय मदत देण्याकरिता होणाऱ्या खर्चाबद्दल उक्ते काम करणारा जबाबदार असेल आणि त्याने असा खर्च दिला पाहिजे. जर असा खर्च शासनाने केला असेल तर तो तात्काळ उक्ते काम करणाऱ्याकडून वसूल करण्यात येईल आणि शासनाच्या अन्य कोणत्याही हक्कास आणि उपायास बाधा न आणता उक्ते काम करणाऱ्याला प्रदेय असलेल्या किंवा प्रदेय होणाऱ्या रकमेतून तो खर्च वजा करण्यात येईल.

७ उक्ते काम करताना, कोणतीही मागणी करण्याचे कारण उपस्थित झाल्यापासून [illegible], वर्गीकरण किंवा संकल्पचित्र इत्यादीमध्ये बदल करण्यासंबंधीच्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत प्रभारी कार्यकारी अभियंत्याकडे लेखी मागणी सादर केल्याखेरीज, कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव त्याला शासनाकडून कोणतीही नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

८ निविदेमध्ये नमूद केलेले, कामाच्या विविध बाबींचे दर, संबंधित बाबी मंजूर विनिर्देशानुसार पूर्ण झाल्या असल्याचे मानण्यात आल्यानंतरच विधिग्राह्य होतील. ज्या प्रकरणामध्ये कामाच्या बाबी याप्रमाणे पूर्ण झाल्या असल्याचे मान्य केले जात नाही, त्या प्रकरणामध्ये कार्यकारी अभियंता, अंतिम किंवा चालू अकाउंट बिले तयार करताना, त्याला वाजवी वाटेल अशा कमी दराने अशा बाबींकरिता रकमा प्रदान करू शकतो.

९ (एक) उक्ते काम करणाऱ्याला बारा वर्षांहून कमी वयाच्या कोणत्याही व्यक्तीला कामावर ठेवता येणार नाही.

(दोन) उक्ते काम करणाऱ्याला, भारवाहक म्हणून दोरी किंवा बारीक दोरखंड वापरलेल्या गाढवांना किंवा इतर प्राण्यांना कामाला जुंपता येणार नाही. भारवाहक पट्टा कमीतकमी तीन इंच रुंद व नवारीचा असला पाहिजे.

(तीन) आजारी पडलेले, लंगडे किंवा कृश असलेले किंवा पूर्ण वाढ न झालेले प्राणी कामाला जुंपता येणार नाहीत.

(चार) कार्यकारी अभियंत्याला किंवा त्याच्या नावाने या शर्तीबरहुकूम काम करीत नसल्याचे आढळलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राण्याला कामावरून काढून टाकण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे आणि अशा रीतीने कामगार किंवा प्राणी कामावरून काढून टाकल्यामुळे काम पूर्ण करण्यात झालेल्या विलंबाची जबाबदारी शासन स्वीकारणार नाही.

(पाच) उक्ते काम करणाऱ्याने हाती घेतलेल्या कामावर ठेवलेल्या कामगारांना रास्त व किमान मजुरी देईल. कामगारांना किती असावी, मजुरी रास्त आणि वाजवी नसल्याच्या कारणावरून उक्ते काम करणाऱ्या व त्याच्या हाताखालील कामगार यांच्यामध्ये वाद उत्पन्न झाल्यास, हा वाद निर्णय व करारा, कार्यकारी अभियंत्याकडे निर्देशित करण्यात यावा व कार्यकारी अभियंता त्यावर निर्णय देईल. कार्यकारी अभियंत्याने दिलेला निर्णय निर्णायक असेल व तो उक्ते काम करणाऱ्यावर बंधनकारक असेल. परंतु अशा निर्णयामुळे शासनाने संमत केलेल्या निविदा दराने करावयाच्या प्रदानासंबंधीच्या करारातील अटीवर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही.

१० उक्ते काम करणाऱ्याच्या कामगारांचे रास्त, त्यांना दोन्हीपैकी असेल अशा दिवसाच्या कोणत्याही कॅलेंडर कालावधीमध्ये संबंधितास (रोख) दिली जाईल. मात्र ही रक्कम दहा रुपयांपेक्षा अधिक नसली पाहिजे. दहा रुपयांपेक्षा अधिक नसलेली रक्कम रोख दिली जाईल.

११ ठराविकस्त भागातील कामगारांचे सेवायोजन—जर शासनाने, स्थानाच्या ठिकाणापासून १६ किलोमीटरच्या परिसरातील कोणत्याही गावामध्ये दुष्काळी किंवा टंचाईची परिस्थिती जाहीर केली असेल तर, उक्ते काम करणाऱ्या/कंत्राटदार यांना सहाय्यार्थ आवश्यकता आहे, असे कार्यकारी अभियंत्याने किंवा असे प्रमाणित करण्याचे काम करण्याची शक्ती अभियंत्याने ज्याला प्रदान केली आहे, अशा व्यक्तीने, प्रमाणित केलेल्या कोणत्याही व्यक्तींना, अकुशल कामगारांकरिता योग्य वाटेल अशा कामावर ठेवील आणि शासनाने यासंबंधात निश्चित केले असतील, अशा दरापेक्षा कमी नसेल अशा किमान दराने अशा कामगारांना मजुरी देण्याचे बंधन त्याच्यावर असेल. या संबंधाची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात कोणताही विवाद उद्भवल्यास, त्यावर कार्यकारी अभियंता निर्णय देईल, हा निर्णय अंतिम आणि उक्ते काम करणाऱ्यावर/कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

१२ कंत्राटदाराने शक्यतोवर नजिकच्या सेवायोजन कार्यालयाकडून आवश्यक तितके कुशल व अकुशल कामगार मिळवले पाहिजेत.

ZX 20·9(i)



(4)

अनुसूची 'ब'

करारनाम्याच्या कामासाठी सा. बां. विभागाच्या/पाटबंधारे विभागाच्या भांडारामधून पुरवावयाची साधनसामुग्री (सांधारे) आणि त्यासंबंधीचा आकारावयाचे दर दर्शविणारी अनुसूची

| तपशील | उक्त काम करणाऱ्याला ज्या दराने साधनसामुग्री पुरवण्यात येईल, तो दर | | | साधनसामुग्री सुपूर्द करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| | युनिट | रुपये | पैसे | |
| | | | | |

टीप—(१) —निविदा सादर करणाऱ्या व्यक्तीने किंवा संस्थेने, निविदा सादर करण्यापूर्वी, कार्यकारी अभियंत्याने नमुना देताना वरील अनुसूचीमध्ये दर नमूद केले आहेत किंवा कसे, हे पाहिले पाहिजे.

(२) कंत्राटदारांना कामाकरिता विनामूल्य पुरवावयाच्या मालाची नोंद अनुसूची 'ब' आणि खिवाय अनुसूची 'अ' मध्येही केली पाहिजे. कंत्राटाच्या नमुन्याबरोबरच विनिर्देश जोडले पाहिजेत.

(ठेकेदार काम करणाऱ्याची सही)

कार्यकारी अभियंत्याची
—————— सही
सहाय्यक अभियंत्याची

(टी) ४३५

४४ 20.9(1)



अनुसूची 'ब'

घर बांधण्याच्या कामाच्या बाबी दर्शविणारे ज्ञापन

| नाव/क्रमांक | कामाची बाब | अंदाजित / अनुसूचित दर | | | वृनिट |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | आकड्यात | | अक्षरात | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| | | रु. | पै. | | |

संपूर्ण काम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे निदेशपुस्तक व विभागाचे यथानिर्देशित इतर विनियम यांच्या अनुसार केले पाहिजे.

(उक्ते काम करणाऱ्याची सही.)

(कार्यकारी अभियंता)
(सहाय्यक अभियंता)

टीप.—आवश्यक वाटल्यास जादा पृष्टे जोडून मजकूर पुढे चालू ठेवावा.